# ग्रामपंचायत कनेरी
## पंचायत समिती गडचिरोली जिल्हा परिषद,गडचिरोली
## ई-निविदा सुचना क्रमांक बी-1/01/2026-27

ग्रामपंचायत कनेरी पंचायत समिती गडचिरोली जिल्हा परिषद,गडचिरोली अंतर्गत ग्रामपंचायत कनेरी करीता खालील कामाकरिता महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -2010/275/ प्र.क्र. 172/पंरा-7 दिनांक 19 ऑक्टोंबर 2011 नुसार जिल्हा परिषदे अंतर्गत फक्त पंजीबध्द कंत्राटदाराकडुन शेकडेवारी दराने www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

**निविदा धारकांसाठी सुचना:**

1. www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर Latest Tender अथवा Tender by location अथवा Tender by organization या लिंक वरुन RDD-CEO-GADCHIROLI मधून किंवा वरील वेबसाईटवर login केल्यानंतर कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यांत आलेल्या निविदांची यादी, अटी व शर्ती, BOQ, शेडयूल बी व इतर आवश्यक माहिती पाहण्यासाठी / Downloads करण्यासाठी उपलब्ध होईल. तसेच ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध होईल.

2. कोरे निविदा प्रपत्र खरेदी करण्यासाठी तसेच निविदा भरण्यासाठी सुद्धा युजर आयडी म्हणजे आपला ई- मेल आयडी व गुप्त पासवर्ड देऊन निविदा भरता येईल.

3. सदर कामाच्या निविदेत अनुक्रमे 1) पंजीयन प्रमाणपत्र (जिल्हा परिषद) 2) आयकर कर आर्थिक वर्ष उत्पन्न विवरण 2023-24,2024-25,2025-26 पर्यंत विधिग्राहया असल्याबाबत ,3) व्यावसायिक कर (Professional Tax) बाबतचे क्लिअरन्स प्रमाणपत्र दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत वैध असणे बंधनकारक राहील 4) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र 5) आयकर पॅन कार्ड 6) निविदा फी व इसारा रक्कम भरणा कल्याची पावती दिलेल्या अनुक्रमांका प्रमाणे Orignal document स्कॅन करुन सादर करणे आवश्यक आहे.( टिप. झेरॉक्स प्रती, छायांकित प्रती वरुन आपली निविदा स्विकृत करण्यात येणार नाही.Upload करावी,अनावश्यक प्रमाणपत्र Upload करु नयेत.

4.सदर निविदेमधील कंत्राटदारास महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी-2022/प्र.क्र.50/इमा.2, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई – 400 032, दिनांक 11/05/2022 मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

5. **अत्यंत महत्वाचे :-**

कंत्राटदाराने त्यांच्या नोंदणी संबंधीचे सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरुपात तसेच निविदा फी व इसारा रक्कम Online (Net Banking) पध्दतीने www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर Online Payment Mode मध्ये दर्शविलेल्या MAH e-procurement payment Gateway मधील खात्यात जमा करावी. या दोन्ही भरणा संबंधीचे दस्ताऐवज स्कॅन केलेल्या स्वरुपात ई-निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**या निविदेची पुढील सर्व कार्यवाही व मुदतवाढ शुध्दीपत्रके www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहील**

नोंदणीकृत कंत्राटदारानी अधिकृत DSC प्राप्त करुन घेवून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन केवळ ई-निविदा पध्दतीनेच निविदा सादर करावी.

| अ. क्र. | कामाचे नांव | तालुका | अंदाजीत रक्कम | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी | को-या फार्मची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अनु जाती व नव बौध्द घटकांचा विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२५-२६** | | | | | | |
| 1 | **ग्रामपंचायत कनेरी मौजा कनेरी टोली येथे रमेश बांबोडे ते शामसुंदर गेडाम यांच्या घरापर्यंत सी.सी. रोड बांधकाम करणे. ता.गडचिरोली जि.गडचिरोली** | गडचिरोली | 1000000 | 10000 | 06 महिने | 1180/- | वर्ग 1 ते 8 |

| | |
|---|---|
| 1 | **शासनाकडुन ग्रामपंचायतीला निधि उपलब्धनुसार कंत्राटदाराला कामाचे देयक देण्यात येईल. व करारनामा केल्यानंतर काम पुर्ण करण्याची जबाबदारी ही कंत्राटदाराची असेल. काम विहीत मुदतीस न झाल्यास कंत्राटदारावर नियमानुसार कार्यवाही करून कंत्राटदाराचे करारनामा रद्द करण्याचे अधिकार हे ग्रामपंचातीला असतील.** |
| 2 | कंत्राटी कामाचा व ती कामे पुर्ण करण्यासाठी नियुक्ती करण्यांत येणा-या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे काढणे आवश्यक राहील. अन्यथा करारनाम्याचे रक्कमेच्या 1% विमा रक्कम प्रथम चालु देयकातुन कपात करण्यांत येईल. तसेच कंत्राटदारांनी त्यांचे आस्थापनेवर नियुक्त मजुर/कर्मचाऱ्यांचे वेतन अदायगी करतांना,आधार कार्ड संलग्न करुनच वेतन अदा करावे,सदर आधार क्रमांक संबंधीत कंत्राटदाराचे बँक खात्याशी सलग्नीत करावे. |
| 3 | **महाराष्ट्र शासन निर्णय ग्राम विकास विभाग, शा.नि.निविदा/012/प्र.क्र/97 पंरा-7/ दिनांक 23 सप्टेंबर** 2013 मधील परिच्छेद क्र ३ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| 4 | निविदा स्विकृती बाबत लेखी सुचना मिळल्या पासुन 2 दिवासचे आंत सुरक्षा ठेव भरणा करुन करारनामा न केल्यास इसारा रक्कम जप्त करुन निविदा नामंजुर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतला राहील. निविदा स्विकृती बाबत सुचना त्यांना ई-निविदा पोर्टल देण्यात येतील. करारनामा करतांना शासकिय दरानुसार स्टँप पेपर जोडावे लागेल. |
| 5 | संबधीत कामाकरीता लागणा.री गौण खनिजांचे शुल्क मोकळे केल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र देयका सोबत जोडावे लागेल. |

| | |
|---|---|
| 6 | कंत्राटी कामाचा व ती कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्ती करण्यांत येणा-या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे काढणे आवश्यक राहील. अन्यथा कररनाम्याचे रक्कमेच्या 1% विमा रक्कम प्रथम चालु देयकातुन कपात करण्यांत येईल. तसेच कंत्राटदारांनी त्यांचे आस्थापनेवर नियुक्त मंजुर/कमंचा-याचे वेतन अदायगी करतांना , आधार कार्ड संलग्न करुनच वेतन अदा करावे सदर आधार क्रमांक संबंधीत कंत्राटदारचे बँक खात्याशी सलग्नीत करावे. |
| 7 | पार पाडलेल्या कामाचे भुगतान अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यांत येईल.निधी खर्च करण्याच्या कालावधीची मर्यादा संपल्यानंतर काम विलंबाने पुर्ण झाल्यास देय रक्कमेचे भुगतान करण्याची जबाबदारी विभागाची राहणार नाही. |
| 8 | महा. शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, **शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2009/प्र.क्र. 123/ पंरा-7 दिनांक 30 ऑक्टोंबर** 2009 नुसार इमारत बांधकाम मुल्याच्या 1 % उपकर भरणा करणे बंधनकारक राहील. |
| 9 | सर्व प्रकारच्या इमारत बांधकामासाठी आरसीसी काम अगोदर पूर्ण करुन घ्यावे व त्यानंतरच विट बांधकाम करावे. तसेच बिम आणि स्लॅब यांचे कान्क्रीटींग एकत्रीत पणे करणे अनिवार्य राहील. तसेच इमारतीच्या बांधकामासाटी प-लाय अॅश ब्रिक चा प्राधान्याने वापर करावा. |
| 10 | ब-याच वेळेस जुन्या कामामधील किरकोळ कामे दिर्घ कालावधीसाठी प्रलंबीत राहतात व बांधकामाची उपयोगिता कमी होते, यास्तव जुने बांधकाम पूर्ण झाल्याशिवाय नविन बांधकामाची देयके अदा केली जाणार नाही. |
| 11 | विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यास सोबतच्या प्रपत्रात दिल्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल.तसेच कामाच्या मुदतीच्या 50% मुदतीनंतरही काम सुरु न झाल्यास काम रद्द करण्यात येईल. |
| 12 | कोणत्याही प्रकारची दुरुस्तीची कामे सुरु करण्यापूर्वी तीन फोटो (वेगवेगळे) तसेच संबंधीत चल देयकासोबत दुरुस्ती नतरचे फोटो असल्याशिवाय देयक पारीत केले जाणार नाही. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर तीन फोटो अंतिम देयकासोबत जोडावे. सदर बाब इमारत तसेच रस्ते दुरुस्तीसाठी लागु राहील. |
| 13 | निविदा शक्यतो त्याच दिवशी किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्या दिवशी उघडण्यांत येतील. व निविदा उघडण्याच्या वेळेस काही तांत्रीक अडचन आल्यास निविदा रद्द करुन पुनश्च प्रकाशीत करण्यात येईल. |
| 14 | निविदाधारकांनी निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत शक्यतो निविदा भरण्यास विलब करु नये. संकेतस्थळाबाबत शेवटच्या दिवशी कांही तांत्रीक अडचण निर्माण झाल्यास निविदेत मुदतवाढ देता येणार नाही. |
| 15 | वरिल अटीशिवाय इतर कोणताही वाद निविदा भरणेबाबत उपस्थित झाल्यास परिस्थितीनुरुप निर्णय घेण्याचा संपुर्ण अधिकार ग्रामपंचायत कमेटी ला राहतील |
| 16 | (अ) **शासन निर्णय परिपत्रक क्र/सीएपी/2017/इमा-2 दिनांक** 26-11-2018 नुसार कामाच्या अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा 1% ते 10% कमी दराची निविदा भरली असेल तर कंत्राटदाराने कामाच्या किमतीच्या 1% एवढया रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॅारमन्स सिक्युरिटी म्हणुन निविदा उघडण्याचे आत कार्यालयात जमा करावे.<br>(ब) शासन निर्णय कमांक/निविदा 417/प्र क्र247/167 मो प्र-1/ मंत्रालय मुंबई 32 दिनांक 30 नोव्हें 2018 अन्वये पर्फॉरमन्स संकुरीटी रक्कमेचा डी डी /बँक गॅरंटी लिफाफा 1 व 2 उघडल्यानंतर 8 दिवसांचे आत L-1 निविदाधारकाने ग्रामपंचायत ग्रामपंचायत अधिकारी याचे कडे जमाकरणे अनिवार्य राहील. जर एल-1 निविदाधारकाने विहीत मुदतीत additional performance security deposit चा भरणा केला नाही तर व्दितीय एल-2 निविदाधारक एल-1 पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर करण्यात येईल. |
| | **दि.27.09.2018 च्या शासन निर्णयातील** परिच्छेद क्र.4.6.3.(ब) मध्ये खालील प्रमाणे नमूद आहे :- |
| | देकार 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी. द्वारे सादर करणे अनिवार्य राहिल . उदा. 19% कमी दराकरीता (19-5-4) x2 = 8%) |
| | एवजी देकार 15% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी. द्वारे सादर करणे अनिवार्य राहिल उदा. 19% कमी दरासाठी खालील प्रमाणे पृथकरण |
| | 10% कमी दरापर्यंत 1 % व 15% पर्यंत कमी दरापर्यंत -( 15% -10 % = 5% ) |
| | तसेच (19-15) = 4% करीता (4X2) = 8% असे एकण (1+5+8) = 14 % **(शासन निर्णय लागु राहील)** |
| | क) धनाकर्ष खालील प्रमाणे असावा (Demand Draft) |
| | 1) धनाकर्ष (Demand Draft) ग्रामसेवक ग्रामपंचायत कनेरीयांचे नावे असावा. |
| | 2) प्रत्येक कामाकरिता स्वतंत्र (D.D.) धनाकर्ष असणे आवश्यक आहे. |
| | 3) धनाकर्ष सरकारी बँका किंवा शेडयुल बँकाकडुन काढलेला असावा. |
| | 4) धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर 3 महिने पर्यंत असावी. |
| | 5) धनाकर्षाची प्रत स्कॅन करुन ई-निविदा भरतांना लिफापा क्र.2 मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे. |

| | |
|---|---|
| | 6) धनाकर्ष सिलबंध लिपाफयामधुन कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापासुन (2 Working Days) ग्रामपंचायत कनेरीकार्यालयात जमा करावी लिपाफयावर कामाचे नवा व निविदा सुचना क्रमांक लिहीण्यात यावा. |
| | 7) धनाकर्षाचा बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे. |
| | 8) वरिल पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे /धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबधीत ठेकेदाराची नोंदनी वर्षासाठी स्थगीत ठेवण्यात येईल. यासाठी ग्रामपंचायत अधिकारी यांना पुर्ण अधिकार राहील. |
| | 9) ग्रामपंचायत अधिकारी कडून निम्नतम निविदा धारकाकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतरच कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात येईल. |
| | GST ची अमलबजवणी दिनांक 1 जुले 2017 पासुन सुरु करण्यात आलेली आहे GST च्या अमलबजावणीमुळे शासकिय कंत्राटदार कराच्या बदललेल्या कर रचनेनुसार आकारणी होणार आहे. यासंदर्भात वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक GST/1096/प्र.क्र./81/कराधान-1 दिनांक 19 ऑगस्ट 2017 अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचना सर्व संबंधीत कंत्राटदारांना लागु राहतील यांची सर्व कंत्राटदारांनी नोंद घ्यावी. तसेच कंत्राटदारांनी निविदा सादर करतांना दिनांक 01/07/2017 नंतर लागु झालेल्या GST कराच्या बोज्याचा विचार करुनच निविदा सादर करावी. |
| 17 | निविदाकाराने निविदा भरण्यापूर्वी कामाची व्याप्ती व निविदेमध्ये नमूद केलेल्या माहितीची पडताळणी करण्यासाठी कामाच्या स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करणे बंधनकारक राहील. पूर्वानुभवानुसार अनेक वेळा निविदाकार कामाच्या स्थळाची पाहणी न करता कमी दराने निविदा सादर करतात व त्यानंतर मजूर उपलब्ध नसणे, साहित्य उपलब्ध नसणे किंवा इतर कारणे दाखवून काम वेळेत सुरू होत नाही. त्यामुळे प्रत्येक निविदाधारकाने निविदा भरण्यापूर्वी संबंधित कामाच्या स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक राहील. तसेच कामाच्या स्थळाची पाहणी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक यांच्यासोबत संयुक्तरीत्या करून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्रावर ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक यांची संयुक्त स्वाक्षरी असणे आवश्यक आहे, अन्यथा ते प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. उपसरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| 18 | आर्थिक निविदा (Financial Bid) उघडल्यानंतर संबंधित कंत्राटदारास करारनामा करण्यासाठी स्वतंत्रपणे कोणतीही लेखी किंवा तोंडी सूचना देण्यात येणार नाही. आर्थिक निविदा उघडल्याची माहिती व पुढील कार्यवाहीबाबतची सूचना माहाटेंडर पोर्टलवर (Mahatender Portal) प्रकाशित करण्यात येईल.सदर सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर 2 दिवसांच्या आत संबंधित कंत्राटदाराने आवश्यक सर्व कागदपत्रांसह कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करणे बंधनकारक राहील. निर्धारित कालावधीत कंत्राटदार उपस्थित न राहिल्यास किंवा करारनामा न केल्यास त्यास कोणतीही मुदतवाढ (Grace Period) देण्यात येणार नाही. अशा परिस्थितीत संबंधित कंत्राटदाराची निविदा रद्द करण्यात येईल व पुढील योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. |
| 19 | अंतिम दिनांक व वेळेपर्यंत पोर्टलवर अपलोड केलेली कागदपत्रेच अंतिम मानली जातील. अंतिम मुदत संपल्यानंतर कोणत्याही निविदाधारकास कागदपत्रे सादर करण्यासाठी किंवा दुरुस्ती करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ (Grace Period) देण्यात येणार नाही. अशा बाबतीत अपूर्ण किंवा अटींना न जुळणारी निविदा सरळ अपात्र घोषित करण्यात येईल. |
| 20 | सदर निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर पूर्णपणे किंवा अंशतः रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याकडे राखून ठेवण्यात आला आहे. |
| 21 | **उपरोक्त कामांच्या निविदा व अर्ज खालील दर्शविलेल्या तारखांना उपलब्ध होतील व स्विकारण्यात येतील.** |

| अ.क्र | तपशील | निविदा खरेदी कालावधी | निविदा प्राप्तीचा कालावधी | निविदा उघडण्याची संभाव्य तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | रु. 5.00 लक्ष ते ..........(बांधकामे) | (कालावधी ऑनलाईन प्रमाणे ) | | |

प्रशासक
प्रशासक
ग्रा.पं.कनेरी
ग्रामपंचायत कनेरी

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कनेरी

Signature Not Verified
Digitally signed by TUSHAR TATYAJI MADAVI
Date: 2026.05.16 18:20:25 IST
Location: Maharashtra-MH